शालार्थ प्रणाली पुर्नविकासित करण्यासाठी नियुक्त Maha-IT संगणक तज्ञांना सेवा शुल्क अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१५१९/प्र.क्र. ३/संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- ९ एप्रिल, २०१९.

वाचा :-

1) शासन निर्णय क्रमांकः मातंसं-१७१७/प्र.क्र.१११/३९, दि.३ एप्रिल, २०१८.
2) Maharashtra Information Technology Corporation Limited, Proforma Invoice dated.27.03.2019.

प्रस्तावना :-

ई- गव्हर्नन्स योजनेअंतर्गत विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वेतन देयके ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी सन २०१२ पासून शालार्थ प्रणाली सुरु करण्यात आली आहे. सदर शालार्थ प्रणाली TCS कडून परिचालित करण्यात येत होती. परंतु शालार्थ प्रणालीमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाला असल्याने शालार्थ प्रणाली बंद पडली आहे. शालार्थ प्रणाली पुन: कार्यान्वित करणेसाठी मा.अप्पर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.९.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत व दि.१५.१२.२०१८ रोजी मा.मंत्री महोदयांकडे झालेलया बैठकीत शालार्थ प्रणाली Maha-IT मार्फत पुर्नविकसित करण्याबाबत निर्णय झाला. शालार्थ प्रणाली विकसीत करण्यासाठी Maha-IT संगणक तज्ञ नियुक्त केले असून, Maha-IT ला संगणकीय सेवा शुल्क अदा करण्यासाठी रु.२९,६२,२११/ इतकी रक्कम वितरीत करण्याबाबत Maha-IT यांच्या संदर्भ क्र.२ च्या अनुषंगाने ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

२. संदर्भ क्र.१ मधील सुधारीत दरपत्रकानुसार शालार्थ प्रणालीचे कामकाज पाहण्याऱ्या Maha-IT संगणक तज्ञांचा वेतनाचा तपशिल परिशिष्ट “अ” मध्ये सोबत जोडला आहे.

३. शालार्थ प्रणालीसाठी नियुक्त केलेल्या Maha-IT च्या संगणक तंज्ञाचे वेतन रु.२९,६२,२११/- सोबत जोडलेल्या **परिशिष्ट “अ”** नुसार अदा करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. यावरील खर्च मागणी क्रमांक. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण,८०-सर्वसाधारण शिक्षण,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१९-२० च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व सहायक संचालक, (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०९१५३३१२४६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.04.09 15:38:34 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अ.मु.स., वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स., शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहायक मंत्रालय, मुंबई.
३) प्र.स., माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८) निवडनस्ती/ संगणक कक्ष.

परिशिष्ट- "अ"

माहे १९ नोव्हेंबर, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ चा तपशिल:-

Sr. No.	Manpower Description	No.of Persons	Required Period (In Months/ Days)	Rate Per Months(Exclusive of Service Tax) (Rs.)	Total Amount (in Rs.)
		(A)	(B)	(C)	(D)
1.	Sr.Software Developer	**1**	(1 Jan.2019 To 31 Mar. 2019)	1,16,424.00	3,49,272.00
2.	Software Developer	1	(19 Nov.2018 To 31 Mar. 2019)	58,212.00	2,56,132.00
3.	Software Tester	1	(21 Nov.2018 To 31 Mar. 2019)	46,332.00	2,00,772.00
4.	Database Administrator	1	(2 Jan.2019 To 31 Mar. 2019)	77,220.00	3,06,389.00
5.	Network Administration	1	(19 Nov.2018 To 31 Mar. 2019)	97,416.00	4,28,630.00
6.	Project Manager	1	(12 Feb.2019 To 31 Mar.2019)	2,73,715.00	4,39,899.00
7.	Business Analyst	1	(19 Nov.2018 To 31 Mar. 2019)	1,20,285.00	5,29,254.00
	Total Amount (Rs.)				**25,10,348.00**
	Central Goods & Services Tax @ 9.00% on				**2,25,931.32**
	State Goods & Services Tax @ 9.00% on				**2,25,931.32**
	Gross Total **(In Rupees Twenty Nine lakhs Sixty Two Thousand and Two Hundred Ten and Sixty four paisa Only)**				**29,62,210.64**